# झेप

' युवकांच्या विकासासाठी '

मार्च २०२० | अंक नववा




## या अंकात -

**महिला दिन विशेष : तेजस्वी सातपुते यांची माहिती**

**पान क्रमांक - १०**

प्रिय वाचक,

हा झेपचा नववा मराठी अंक आहे.

अंक वाचण्यास अधिक रंजक आणि उपयुक्त ठरावा, तुमच्यापर्यंत आम्ही जी माहिती पोहचवत आहोत ती जास्तीत जास्त बिनचूक असावी असा आमचा प्रयत्न असतोच.

मासिक सुरु करण्यामागचा उद्देश असा आहे की, कॉलेजवयीन विद्यार्थ्यांना भारताचे भविष्य मानले जाते. आपल्या सर्वांमध्येच वेगवेगळे कौशल्ये आणि क्षमता आहेत. परंतु मोबाईलचा वापर वाढल्यामुळे आपण आपल्या कौशल्ये आणि क्षमतांचा पुरेपूर वापर न करता वेळ वाया घालवतो आहे की काय हा प्रश्न आपणच स्वतःला विचारला पाहिजे.

आपण पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण करतांना आपली संस्कृती विसरत आहोत. आपल्या देशात अशा कित्येक गोष्टी आहेत ज्या इतर कोणत्याही देशात नाही. आपल्या दैनंदिन जीवनासाठी त्या अगदी पूरक आणि फायदेशीर आहेत. या गोष्टींची जाणीव आपल्यामध्ये असावी आणि ते आपल्याला सतत आठवत रहावं.

ज्या विद्यार्थ्यांना कॉलेज मध्ये इतरांसमोर व्यक्त होता येत नाही त्यांच्यासाठी हे माध्यम उपलब्ध व्हावं. यासाठी हे मासिक सुरु केले आहे. आपण याचे स्वागत प्रेमाने केले आहे याचा खूप आनंद आहे.

- शरयू झंवर, संपादक.


**संपादक**

शरयू झंवर

**तांत्रिक संपादक**

ओम देशमुख

**माहिती प्रमुख**

सायली अभंग

**आमचे साथीदार**

रसिका परदेशी, सुवर्णा कुटे, संयुक्ता पाथरकर, अफान शेख, हर्षल कासार

# अनुक्रमणिका

१.महाराष्ट्रातील निसर्ग सौंदर्य: जीवधन



२.आर्थिक साक्षरता

३. डेथ नोट (जपानी मालिका)

४. इंडियन स्पेशल फोर्सेस मध्ये भरती
कसे व्हायचे?




५. महिला दिन विशेष : तेजस्वी सातपुते

६. व्यक्त व्हा



# महाराष्ट्रातील निसर्ग सौंदर्य
# जीवधन



# महाराष्ट्रातील निसर्ग सौंदर्य



जानेवारी महिना संपत आला की गिर्यारोहकांची गडबड सुरू होते. उन्हाळा सुरू होण्या अगोदर सह्याद्रीतील गड किल्ले करून घ्यावे असा सल्ला प्रत्येक गिर्यारोहकाला आपल्या गुरू कडून मिळत आलेला आहे.आम्ही मागच्या महिन्यात 'किल्ले जीवधन' हा ट्रेक केला.

जीवधन हा नगर -कल्याण मार्गावरील, प्राचीन नाणेघाटाशी जवळीक साधणारा आणि घाटघर गावाच्या हद्दीत असणारा, अभेद्य, चोहोबाजूने उभे कातळ असलेला अप्रतिम गड आहे. या गडावर जाण्यासाठी दोन मार्ग आहेत. एक घाटघर गावातून आणि दुसरी कल्याण, नाणेघाट कडून येणारी वाट. दोन्ही वाटा उभ्या कातळातून खोदून केलेल्या पायऱ्यानी गडावर घेऊन जातात. आम्ही कल्याण दरवाजाच्या वाटेने चढावयास सुरुवात केली. सुरुवातीला बांबूचे बन आणि दाट झाडांनी आच्छादलेली वाट लागते. देशी, औषधी वनस्पती आणि आणि फुलांचा विशिष्ट वासाने वातावरण भरून गेले होते.

जंगलातील वाट संपल्यावर उभ्या कतळातील खिंडीतून काढलेल्या पायऱ्या सुरु होतात. मोठ मोठ्या पायऱ्या चढतांना चांगलीच दमछाक होते. शेवटच्या टप्प्यावर इंग्रजांनी सुरुंग लावून पायऱ्या तोडल्या असून, तेथे बांधलेल्या दोराच्या साहाय्याने जीव टांगणीला लावून चढून जावे लागते. वरती जाताच डावीकडे गोलाकार रचलेल्या दगडांची उभी भिंत आणि शेजारी कोरलेला दरवाजा. या दगडी बांधकामाला दाद दिल्याशिवाय पुढे जाता येत नाही. गडाच्या डाव्या बाजूला, गडापासून वेगळा झालेला वानारलिंगीचा सुळका आव्हान देत राहतो. आम्ही चढत्यावेळी वानर लिंगीवर एक ७-८ जणांचा समूह रॅपलिंग करताना दिसला.

जीवधन आणि हडसर या दोन्ही गडाचे दरवाजे खूपच सारखे आहेत. गड चढतांना कुठूनही नाणेघाटाची वाट नजरेच्या टप्प्यात राहते. यावरून नाणेघाटासाठी जीवधन हा गड इतिहासात किती महत्त्वाचा होता हे लक्षात येते.

दरवाजातून आत गेल्यावर संपूर्ण डोंगरभर गवत पसरलेले आहे. डाव्या बाजुच्या पायवाटेने चढून गेल्यावर समोर तटबंदी दिसते. गडावर कोणत्याही बाजूने खाली बघितले तर कडेलोट काय असू शकते हे लक्षात येते, खरोखर भय वाटते. तेथून बालेकिल्ल्याच्या दिशेने चालत जात असताना अगोदर घाटघर कडील वाट दिसते. ती वाट आम्हाला पाहायची असल्याने खाली उतरून जातांना लक्ष जाते ते टेकडी लगत दडलेल्या बांधकामाकडे!! एखादे लेणे वाटावे अश्या वास्तूच्या आतमध्ये काय दडले आहे बाहेरून समजतच नाही. मुखमंडपवजा प्रवेशद्वार त्यांवर संपन्नतेचे प्रतिक असलेले गजांतलक्ष्मीचे शिल्प!! दोन्ही बाजुंनी जलधारा सोडणारे हत्ती तर मध्यभागी लक्ष्मी देवता! या शिल्पाच्या खाली चंद्र-सुर्याची शुभप्रतिके काढलेली आहेत. एकूणच प्रवेशावेळी महत्त्व सांगणारी वास्तू, ऐश्वर्याने भरलेली असणार यांत शंका नसावी.

आतमध्ये प्रचंड मोठ्या तीन खोल्या आहेत. डाव्या उजव्या हाताला एक एक खोली आहे.

गूढ आणि खोडकामातून केलेले हे बांधकाम बालेकिल्ल्याच्या अगदी खाली केलेले आहे. धान्य कोठार म्हणून याची ओळख दिलेली आहे. या वास्तूच्या शेजारी एकात एक गुंफलेल्या पाच पाण्याच्या टाक्या आहेत. खाली घाटघर कडून येणारा दरवाजा, कातळातून काढलेल्या पायऱ्या त्याचीही इंग्रजांनी केलेली तोडफोड पाहून मनाला वेदना होते. परंतू अभेद्य अशा गडाचे आणि लढवय्याच्या आठवणीने मन भरून येते. दरवाजाकडील वाट पाहून आम्ही बालेकिल्ल्याकडे चढण्यास सुरुवात केली. जीवधनचा बालेकिल्ला म्हणजे छोटीशी टेकडी आहे. या टेकडीच्या उंच जोत्यावर गडदेवता जीवाबाईंचे वृंदावन आहे. देवीच्या नावावरून गडाला जीवधन नाव पडले आहे. डावीकडे उतरून गेल्यावर लक्ष वेधून घेणारा वनारलिंगीचा सुळका जवळून पाहतांना भीती वाटते. त्याचे रौद्र रूप आडवे पडूनच पाहावे आणि डोळे बंद करून मनात साठवावे असे आहे.

ते सर्व क्षण कॅमेर्यात साठवून, गडाविषयी भरपूर गप्पा मारत उतरायला सुरुवात केली...



या किल्याचा व्हिडियो बघण्यासाठी खालील लिंकवर क्लिक करा

https://www.youtube.com/watch?v=1RJ5uV0-o7M

लेख - किरण झंवर

छायाचित्र - सुमित मणियार




# आर्थिक साक्षरता

छायाचित्र - राफेल गर्सीन, अन्स्प्लाश

प्रत्येकाच्या जीवनात पैसे मध्यबिंदू आहे. त्याशिवाय जगणे कठीण आहे. आपण किती पण पैसे कमावले तरी त्यांची बचत आणि नियोजन जमले नाही तर पैसे टिकवून ठेवणे अवघड आहे. त्यामुळेच आर्थिक साक्षरता महत्वाची आहे. पैसे प्रभावीपणे कसे वापरावे आणि भविष्याकरिता ते कसे साठवून ठेवावे हे ज्ञान अत्यावश्यक आहे.

बजेट तयार करणे – बजेट म्हणजे ठराविक काळासाठीच्या पैस्याचे नियोजन. एका कागदावर आपण किती खर्च करतो याविरुद्ध आपल्याला दरमहा किती पैसे मिळतात याचा मागोवा घेणे म्हणजेच बजेट तयार करणे. बजेटमध्ये उत्पन्न, निश्चित खर्च, इतर खर्च (खाणे, खरेदी, प्रवास, व बचत) यांचा सामावेश असतो.

कर्ज व्यवस्थापित करणे - कर्ज भरणे आणि गुंतवणुकीची उत्पादने समजून घेणे यांच्याशी संबंधित कौशल्ये आपण शिकली पाहिजे.

पैशाच्या संदर्भात सर्वात महत्वाच्या भावना काय आहे?

पैसा किंवा त्याचा अभाव- तीव्र भीती, चिंता आणि भावनिक असुरक्षिततेस उत्तेजन देऊ शकते.

पैशाला लज्जेच्या भावनेने जोडले गेले आहे. ज्या लोकांना आर्थिक समस्या उद्भवतात त्यांना कदाचित असे वाटते की ते जबाबदार प्रौढ म्हणून अयशस्वी झाले आहेत. जर कोणाला पैशाची अडचण येत असेल तर, स्वतःचीच लाज वाटणे हे सहजपणे होऊ शकते. ज्यामुळे परिस्थिती आणखी वाईट होते.

आर्थिक साक्षरतेच्या मानसिक पैलुला चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी आपण कसे शिकू शकतो?

स्वतः ला हे प्रश्न विचारा :

पैशाशी संबंधित असलेल्या भावना काय आहेत आणि त्या कशावर आधारित आहेत?

पैशाच्या माझ्या वृत्तीत मी कोणाचे अनुकरण करू?

अशाप्रकारे आपल्याला पैशातून खरोखर काय हवे आहे हे आपण अधिक जणू शकतो. उदारहणार्थ, काही लोकांना विशिष्ट स्थिती प्राप्त करण्यासाठी प्रामुख्याने पैसे पाहिजे असतात तर काहींना सुरक्षिततेची जाणीव होण्यासाठी पैसे पाहिजे असतात. म्हणूनच आर्थिक साक्षरता खूप महत्वाची आहे. आणि हे प्रत्येक व्यक्तीसाठी लागू होते.

- सुवर्णा कुटे

# डेथ नोट (जपानी मालिका)



१९२७  मध्ये जर्मनीत ‘मेट्रोपोलीस’ नावाचा चित्रपट प्रदर्शित झाला होता. त्या चित्रपटात एक मानवी रोबोट दाखवण्यात आला होता. त्या काळी असे रोबोट वगैरे फक्त काल्पनिक होते. पण हेच काल्पनिक यंत्र एक दिवस आपण सर्वत्र वापरू याचा कोणी विचारही केला नव्हता. आता अनेक कंपन्यामध्ये, दैनंदिन जीवनात ठिकठिकाणी रोबोट वापरला जातो. अवकाश संशोधन, गूगलकडे तर स्वतःची रोबोट सेना आहे.

करमणूक जीवनात महत्वाची असते. यामुळे तणाव कमी होतो आणि मानसिक स्थिती चांगली राहते.कल्पना वास्तविकतेला प्रेरणा देते. १९२७च्या त्या चित्रपटामुळे कदाचित अनेकांना रोबोट बनवण्याची प्रेरणा मिळाली असेल. अश्याच प्रकारचे अनेक चित्रपट आजही बनत आहेत.

चित्रपट खरोखर फक्त कथा आहे. कथा सांगणे ही खरी कला आहे. जपान मध्ये प्रदर्शित केली जाणारी अॅनिमी(anime) नावाची मालिका सध्या खूप चर्चेत आहे. यातल्या डेथ नोट(death note) या भागा बद्दल थोडी माहिती खाली देत आहे. या भागाची आय.एम.डी.बी(IMDb) रेटिंग खालील प्रमाणे.



IMDb rating : 9.0/10.0

Director : Tetsuro Araki

Episodes : 37

Aired : Oct 4, 2006 to Jun 27, 2007

Studios : Madhouse

Genres : Mystery, Police, Psychological, Supernatural, Thriller, Crime

Duration : 23 min per episode

Rating : R - 17+ (violence & profanity)

डेथ नोट ही गुन्हेगारी-थ्रिलर कथा आहे, ज्यात एका वहीत कोणाचेही नाव लिहिल्यावर तो व्यक्ति मरतो.ही वही सापडल्यानंतर गुन्हेगारांना जगातून संपवण्यासाठी १७ वर्षाच्या हुशार विद्यार्थी  लाईट यागामीची रहस्यमय कथा आहे. डेथ नोट आपल्याला न्याय काय आहे ते सांगते. मी जर ही कथा स्पष्ट करत बसलो तर मला १०० पेक्षा जास्त पाने लागतील. म्हणून तुम्ही ती लवकर बघा...

कुठे उपलब्ध आहे? :

- Netflix.
- तुम्हाला जर हे विना शुल्क बघायची असेल तर  "@Death_Note_Series" हे तेलेग्रम बघू शकता.
- हिंदीत बघण्यासाठी खालील युट्यूबच्या लिंकवर जरूर जा.

https://youtube.com/playlist?list=PLZUo5w8ndK1_jDWBM20Atdq0oQirfNwrg

किंवा

https://animetmdubbers.in/death-note-episodes-hindi-dubbed/

वर क्लिक करा.

-हर्षल कासार



# इंडियन स्पेशल फोर्सेस मध्ये भरती कसे व्हायचे ?

छायाचित्र- reddit.com

**मरीन कमांडो फोर्स किंवा मार्कोस कमांडो -:**

मरीन कमांडो फॉर्सची स्थापना फेब्रुवारी १९८७ मध्ये झाली. मरीन कमांडो फोर्सला मार्कोस म्हणूनही संबोधले जाते. समुद्र, जमीन आणि आकाश, सगळीकडे मार्कोस सक्षम आहेत. मार्कोस, भारतीय नौदलाचे स्पेशल ऑपरेशन युनिट आहे.

**मरीन कमांडो फोर्सचे बोधवाक्य -:** THE FEW , THE FEARLESS (जितके कमी, तितके निडर)

**मार्कोस फोर्समध्ये कसे सामील व्हावे? -:**

भारतीय नौदलाचा एक भाग म्हणून सैनिक किंवा अधिकारी या नात्याने मार्कोस फोर्स मध्ये सहभागी होता येते.

फोर्सची निवडप्रक्रिया दोन भागांमध्ये विभागलेली आहे -:

अ) भारतीय नौदलाच्या सैनिकाची तीन दिवसांची शारीरिक तंदरुस्ती आणि योग्यता चाचणी घेतली जाते.

ब) या भागात निवड झालेल्यांची सलग सहा दिवस झोपू देत नाही. आणि त्याच काळात विविध शारीरिक व्यायाम यांची चाचणी घेतली जाते. याच प्रक्रियेला एकंदरीत 'नरक सप्ताह' म्हणूनही ओळखले जाते.

या प्रक्रियेत निवड झालेल्यांची पुढील दीड- दोन वर्षे वास्तविक प्रशिक्षण सुरू केले जाते.

**मार्कोसने हाती घेतलेल्या ऑपरेशनची थोडक्यात माहिती -:**

१) ऑपरेशन पवन १९८७ साली झाली. मार्कोस फोर्सने ‘भारतीय पीस किपिंग’ फोर्सचा भाग म्हणून श्रीलंका येथील जाफना आणि द्राईंकोमालीच्या बंदरावर कब्जा करण्यास मदत केली.

२) तामिळनाडू किनारपट्टीवरील सुरक्षा करण्यासाठी ताशा ऑपरेशन १९९१ सली झाले.

३) कारगिल युध्दाच्या वेळी १९९९ साली मार्कोस भारतीय सैन्यात सहभागी होते.

४) ऑपरेशन रक्षक दरम्यान मार्कोसने अनेक मोहिम हाती घेतल्या. ज्यात त्यांनी सशस्त्र अतिरेक्यांना गुंतवून मारले आहे. हे ऑपरेशन अजूनही चालू आहे .

५) २०२० मध्ये झालेल्या भारत-चीन चकमकीत भारतीय लष्करा समवेत पूर्व लडाखमध्ये मार्कोस तैनात आहेत.

– अफान शेख






# महिला दिन विशेष : तेजस्वी सातपुते




आठ मार्च हा दिवस जगभरात जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. आज जवळ जवळ असे कोणतेच क्षेत्र नाही ज्यात महिलांचा सहभाग नाही. महिलांचे  हक्क, समानता, महिला सन्मान यामुळे महिला दिनाला एक विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. स्त्री- पुरुष समानतेची जागृती झाली असूनदेखील, आजही काही ठिकाणी महिलांवर अत्याचार, अन्याय केले जातात. त्यांना पुरूषांपेक्षा हीन दर्जाची वागणूक दिली जाते. म्हणूनच महिला दिनाच्या निमित्ताने त्यांचे अनन्यसाधारण महत्त्व पटवून देण्यासाठी आजचा दिवस साजरा करणं गरजेचे आहे. जागतिक महिला दिन अर्थात स्त्रीत्वाचा उत्सव. खरं तर रोजचा दिवस प्रत्येक स्त्रीचा असतोच. तिच्या आत्मसन्मानाचा आणि तिच्या कसोटीचाही. केवळ ती स्त्री आहे म्हणून भोगाव्या लागणाऱ्या वेदनेचा आणि ती स्त्री आहे म्हणूनच अनुभवता येणाऱ्या सर्जनत्वाचाही. या दिनानिमित्ताने आपण अशाच एका पोलीस अधीक्षकपद भुषविणाऱ्या ‘तेजस्वी सातपुते’ यांचे कार्य बघणार आहोत.

जर आयुष्यात काही वेगळं करायचं असेल तर तसे निर्णय योग्य वेळी घ्यावे लागतात. गावातली एक सर्वसामान्य मुलगी ते पोलीस अधीक्षक असा तेजस्वी यांचा प्रवास त्याच निर्णयाचं फळ आहे. लोकसेवा आयोगाची परीक्षा देऊन आता साताराचे पोलीस अधीक्षकपद भुषविणाऱ्या तेजस्वी सातपुते यांनी पुरुषी आधिक्य असणाऱ्या क्षेत्रात स्वत:ला सिद्ध केले आहे.

**"मंजिल तो मिल ही जायेगी भटकतेही सही, गुमराह तो वो है जो घरसे निकले ही नही..”**

आपल्या आतापर्यंतच्या प्रवासाचं वर्णन साताऱ्याच्या पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते या शब्दांत करतात. सातारा जिल्ह्यात लॉकडाऊनला सहकार्य करण्याचे नागरिकांना वेळोवेळी, जागोजागी आवाहन करण्यात आले. अशी परिस्थिती हाताळण्याचा पोलिसांना पुर्वानुभव नव्हता. त्यामुळे त्यांना मार्गदर्शन आवश्यक होते. संवेदनशीलपणे नागरिकांना समजावून सांगणे, त्यांची समजूत काढणे यावर भर देण्यात यावा, फारच कुणी ऐकत नसेल तर, कायदा हातात न घेता अशा नागरिकांना पोलीस ठाण्यात आणून गुन्हा दाखल करण्यात यावा, अशा सूचना देण्यात आल्या. याचा सुयोग्य परिणाम झाला. समाज आणि पोलीस यांच्यामध्ये एक आकलन तयार होत गेले. लोक परिस्थिती समजून घ्यायला लागले. आणि पोलीस देखील लोकांच्या अडचणी समजून घ्यायला लागले. सगळच नवीन असल्याने थोडासा अवधी गेल्यावर परिस्थिती नियंत्रणात आली. त्यानंतर पोलिसांनी गरजा लक्षात घेऊन वेगळ्या योजनांवर काम सुरु केले.

यामध्ये प्रामुख्याने जिल्ह्यात येणाऱ्या सर्व मार्गांवर नाकाबंदी करण्यात आली. येणाऱ्या सर्व प्रवाशांची परिपूर्ण माहिती घेऊन ती पुढील योग्य कार्यवाहीसाठी संबंधित खात्यांना देण्यात आली.



परदेशातून येणार्या नागरिकांवर जास्त भर देण्यात आला. सातारा जिल्ह्यातील लाखो नागरीक नोकरी, व्यवसाय निमित्ताने मुंबई - पुणे येथे असतात.

नाकाबंदीमुळे जवळपास ४ लाख नागरीक सातारा जिल्ह्यात परतले होते, हे त्यामुळे कळू शकले. त्यांच्याबाबतची माहिती उपलब्ध होऊ शकली. महसूल आणि आरोग्य यंत्रणेला ही माहिती दिल्यामुळे त्यांना त्यांच्या कामात खूप उपयोग झाला.

पोलीस यंत्रणा परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी सतत सतर्क असतेच. पोलिसांना वेगवेगळ्या पार्श्वभुमीवर जिल्हाभर गस्त घालावी लागते. त्यामुळे साहजिकच त्यांना ठिकठिकाणची वस्तुस्थिती समक्ष अवगत होत राहते. अशा गस्त घालणार्या पोलीस सहकाऱ्यांकडून कुठे अन, काय मदतीची गरज आहे, हे समजून घेण्यात आले. या काळात दानशूर व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, स्वयंसेवी संस्थांनी देऊ केलेली मदत एकत्रीत करुन गरजू लोकांपर्यत जागेवरच उपलब्ध करून देण्यात आली.कोरोनाच्या आव्हानामक परिस्थितीत करत असलेल्या वैशिष्ट्यपूर्ण कामगिरीबद्दल तेजस्वी सातपुते यांना नुकताच दिल्ली येथील 'भारत गौरव अवॉर्ड फौंडेशनतर्फे' "कोरोना सेनानी सन्मान" जाहीर करण्यात आला.

सामाजिक बांधिलकितून काही उपक्रम हाती घेण्यात आले. त्यामध्ये पारधी समाजाची माहिती गोळा करुन त्यांच्यासाठी काही गोष्टी हाती घेतल्या. सातारा जिल्ह्यात अशी ९०० कुटुंबे असल्याचे लक्षात आले. लॉकडाऊनच्या काळात त्यांची उपासमार होऊ शकते हे देखील त्याच माहितीमुळे लक्षात आले.  म्हणून त्यांना जागीच अन्न धान्य पुरविण्याचे काम हाती घेतले.

सातारा जिल्हा पोलीस अधीक्षकपदी नेमणूक झाल्या पासून त्या सतत लोकाभिमूख उपक्रम राबवित आहेत. सोबतच पोलीस दलातील सहकाऱ्यांच्या कल्याणासाठीही त्या कार्यरत आहेत. सातारा जिल्ह्यातील अडचणीत असणाऱ्या जेष्ठ नागरीक, महिला, बालकांच्या हितासाठी त्यांचा "भरोसा कक्ष" अतिशय गतिमान काम करत आहे.

**भरोसा कक्ष योजना -** मुलींनी धीट बनावं, सक्षम व्हावं यासाठी त्यांच्याकडे "निर्भया अभियान" देखील अतिशय नेमकेपणाने काम करीत आहे. गुन्हेगारीला प्रभावी अटकाव करण्यासाठी बीट मार्शल या जुन्या योजनेत नाविन्यपूर्ण आणि आधुनिक गोष्टी सुरू केल्या. निर्भया अभियान किंवा भरोसा सेल हे तर त्यांच्या खात्याकडून राज्यभर राबवले जाणारे प्रकल्प आहेत...




त्या प्रकल्पांना न्याय देत असताना आणखी काही केले पाहिजे. असे त्यांच्या मनात होते. त्यातच प्रत्येक भागाची आपली अशी एक ओळख असते ती लक्षात घेऊन काही गोष्टी करता येतात. त्याच अनुषंगाने त्यांनी स्वतः पुढाकार घेऊन सिमेवर लढणार्या सैनिकांसाठीची योजना सुरु केली आहे.

सध्याच्या कोरोनाच्या बिकट परिस्थितीत वेळेकडे न पाहता दिवसाला १८/१८ तास काम करीत असलेल्या तेजस्वी सातपुते यांना पुढील वाटचालीसाठीं मनःपुर्वक शुभेच्छा

शब्दांकन - रसिका परदेशी

# व्यक्त व्हा...



बागेचे फाटक बंद करून चौकिदार समीरच्या बाकाशी येऊन उभा राहिला.

"अहो साहेब बाग बंद करण्याची वेळ झाली, तुम्हाला जायचं नाही का?" चौकीदाराची हाक ऐकून समीर काहीच न बोलता उठला आणि बॅग घेऊन निघाला.

समीर उच्चशिक्षित मध्यमवर्गीय घरातला तरुण. प्रत्येक मध्यमवर्गीय घरातल्या मुलासारखा तो नोकरी करून आपलं कुटुंब सांभाळत होता. समीरला नोकरी लागून आता वर्ष झालं होतं. त्याने जेव्हा नोकरी लागल्याची बातमी घरी सांगितली, तेव्हा सगळ्यांना खूपच आनंद झाला होता. वर्षभर सर्वकाही ठिक चाललं होतं, पण अचानक त्याच्या आयुष्याने एक वेगळच वळण घेतलं. तो ज्या कंपनीत नोकरी करत होता त्या कंपनीला एकाकी खूप मोठं नुकसान झालं आणि ती कंपनी बंद पडण्याच्या स्थितीत आली होती. म्हणून कंपनीने बऱ्याच कामगारांना कामावरून काढून टाकले होते आणि समीर त्यातला एक होता.

नोकरी जाऊन आता १०-१२ दिवस झाले होते. पण समीरने अजून त्याबद्दल घरी काहीच सांगितले नव्हते. कारण घरची सगळीच जबाबदारी त्याच्या खांद्यांवर होती. तो लहान असतांनाच त्याच्या वडिलांचे निधन झाले होते. म्हणून लहान भावचं शिक्षण, आईच्या औषधांचा खर्च, सगळं त्याच्याच पगारावर चालू होतं. घरच्यांना काही कळू नये म्हणून तो रोज बरोबर १० वाजता ऑफिसला जातोय असं सांगून घराबाहेर पडायचा आणि दिवसभर बागेतल्या बाकावर बसून विचारचक्रात गुंग असायचा. रोज संध्याकाळी ६ वाजता चौकिदार त्याला घरी जायला सांगायचा.

समीरने या १०-१२ दिवसात दुसरी नोकरी शोधण्याचा प्रयत्न केला. पण त्याला सगळीकडे नकारच भेटला. सतत नकार ऐकून समीर खूप निराश झाला होता. त्याच्या चेहऱ्यावरचं ते मनमोकळं हसू तर जणू गायबच झालं होतं.

खरतर समीरला या प्रसंगात गरज होती 'व्यक्त होण्याची'. आपल्या माणसांना विश्वासात घेऊन सगळं काही खरं सांगण्याची आणि सकारात्मक दृष्टीकोनाची.



\- सायली अभंग

# धन्यवाद




**संपर्क**

geekyideas2020@gmail.com

@geeky_ideas  Website - झेप  Geekyideas